दैनिक

# चक्रमक

संपादक : शामसुंदर चितोडा          कार्यकारी संपादक : कैलास फुलारी




✻ वर्ष : ०१ ले ✻ | ✻ अंक : ६९ ✻ | ✻ शनिवार १० ऑक्टोबर २०२६✻ | ✻ जालना ✻ | ✻किंमत : २ रूपये ✻ | ✻पृष्ठे : ४ ✻

◎Volume 01◎ | ◎ Issue 69 ◎ | ◎ Saturday, Date : 10 October 2026 ◎ | ◎ Jalna ◎ | ◎Price Rs. 2◎ | ◎Pages 4 ◎

## फेक नरेटिव्ह आणि अराजकतेच्या प्रयत्नांना बळी पडू नका; देशाच्या स्थैर्य आणि विकासासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहा! : आ. लोणीकर

जालना/प्रतिनिधी : सुशिक्षित युवकांच्या अपेक्षा, रोजगाराच्या संधी आणि पदवीधरांच्या विविध अडचणी समजून घेऊन त्यांना योग्य प्रतिनिधित्व मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. सतीश चव्हाण यांची ही चौथी निवडणूक असून, त्यांना पदवीधरांसह सुशिक्षित युवकांच्या प्रश्नांची जाण आहे. अशा शब्दात मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना महायुतीचे अधिकृत उमेदवार आमदार सतीश भानुदासराव चव्हाण यांच्या प्रचारार्थ आयोजित महत्त्वपूर्ण संवाद बैठकीत माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांनी पदवीधरांच्या प्रश्नांवर आपली भूमिका मांडली.



पदवीधरांच्या दृष्टीने रोजगारनिर्मिती, बेरोजगार युवकांना संधी, स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहन, कौशल्य विकास आणि स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अडचणी हे महत्त्वाचे विषय आहेत. उच्च शिक्षण पूर्ण करूनही अपेक्षित रोजगार न मिळणे, नोकरी भरती प्रक्रियेतील अडथळे आणि बदलत्या रोजगार बाजारपेठेनुसार कौशल्ये विकसित करण्याची गरज यांसारख्या प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा होणे आवश्यक आहे. पदवीधरांच्या समस्या केवळ निवडणुकीपुरत्या चर्चे त न ठेवता त्यावर ठोस उपाययोजनांसाठी प्रयत्न करणे महत्त्वाचे असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी स्पष्ट केले.

शिक्षक, प्राध्यापक, विविध शैक्षणिक संस्थांतील कर्मचारी आणि व्यावसायिक क्षेत्रातील पदवीधरांच्या प्रश्नांनाही योग्य प्राधान्य मिळाले पाहिजे. शिक्षण क्षेत्रातील अडचणी, शैक्षणिक संस्थांमधील प्रश्न, पात्र उमेदवारांच्या भरतीशी संबंधित समस्या आणि पदवीधरांना उपलब्ध होणाऱ्या व्यावसायिक संधी यांबाबत संबंधित स्तरावर प्रभावी पाठपुरावा होणे गरजेचे आहे. पदवीधर मतदारसंघाचा प्रतिनिधी हा या घटकांच्या समस्या समजून घेणारा आणि त्या विधान परिषदेत अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडणारा असावा. असे प्रतिपादन शिक्षक आमदार श्री विक्रम काळे यांनी यावेळी केले

या संवाद बैठकीत निवडणुकीच्या अनुषंगाने पदवीधर मतदारांशी संपर्क, मतदार नोंदणी, जनसंपर्क आणि कार्यकर्त्यांमधील समन्वय यावरही चर्चा करण्यात आली. मराठवाड्यातील पदवीधरांच्या अपेक्षा जाणून घेऊन त्यांचे प्रश्न समजून घेण्यासाठी व्यापक संवाद साधण्याचे आवाहन आमदार बबनराव लोणीकर यांनी केले. रोजगार, शिक्षण, व्यावसायिक संधी आणि युवकांच्या भविष्याशी संबंधित विषयांना केंद्रस्थानी ठेवून पदवीधरांचे प्रश्न सक्षमपणे मांडले जावेत, हा या बैठकीतील मार्गदर्शनाचा मुख्य आशय होता.

महाराष्ट्रासह देशभरात खोट्या कथनांच्या माध्यमातून संभ्रम निर्माण करून सामाजिक वातावरण अस्थिर करण्याचे प्रयत्न होत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. वस्तुस्थितीची पडताळणी न करता अफवा आणि दिशाभूल करणाऱ्या माहितीवर विश्वास ठेवणे लोकशाहीसाठी घातक ठरू शकते. देशाची एकता,

(पान ३ वर)

## जालना जिल्ह्यात दुष्काळ पाहणी दौऱ्यावर आलेल्या विजय वडेट्टीवार यांच्याकडून आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाचे सांत्वन; २५ हजारांची तातडीची मदत



जालना / पिरपिंपळगाव : जालना जिल्ह्यात भीषण दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी आलेल्या काँग्रेस पक्षाचे विधिमंडळ नेते तथा माजी मंत्री आमदार विजय वडेट्टीवार यांनी दिनांक ०८ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री १० वाजता पिरपिंपळगाव येथील आत्महत्याग्रस्त शेतकरी स्व. विष्णु तुळशीराम कोल्हे यांच्या निवासस्थानी भेट दिली. याप्रसंगी त्यांनी शोकाकुल कुटुंबाचे सांत्वन करून धीर दिला.

आमदार वडेट्टीवार यांनी स्व. विष्णु कोल्हे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. त्यानंतर त्यांनी कुटुंबीयांशी सविस्तर संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. या कठीण प्रसंगी कुटुंबाला आर्थिक हातभार म्हणून जिल्हा काँग्रेस कमिटीच्या माध्यमातून २५ हजार रुपयांची रोख मदत सुपूर्द



करण्यात आली.

या दुःखद प्रसंगी उपस्थितांशी व परिसरातील शेतकऱ्यांशी संवाद साधताना वडेट्टीवार म्हणाले की, सध्याची दुष्काळी परिस्थिती अत्यंत बिकट आहे, परंतु कितीही मोठे संकट आले तरी कोणत्याही शेतकऱ्याने हताश होऊन आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलू नये.

यावेळी काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष कल्याणराव दळे, प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र राख, अल्पसंख्यांक विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष बदरभाई चाऊस, जिल्हा सरचिटणीस शांतीलाल (पान ३ वर)

## रोजगार व करिअरच्या संधींबाबत विद्यार्थ्यांना केले मार्गदर्शन

जालना : जालना समाजकार्य विद्यालयात परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या अंतर्गत समाजकार्य व नोकरीच्या संधी या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.



या व्याख्यानात मा. श्री.जगताप आर.बी. (सदस्य) बाल न्याय मंडळ,जालना. सायकॉलॉजिस्ट यांनी समाजकार्याच्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या विविध रोजगार व करिअरच्या संधींबाबत मार्गदर्शन केले. समाजकार्य म्हणजे केवळ स्वयंसेवी संस्थांमध्ये (छक्र्ज) काम करण्यापुरते मर्यादित क्षेत्र नसून बाल संरक्षण, महिला व बालविकास, वैद्यकीय समाजकार्य, समुपदेशन, मानसिक आरोग्य, मानव संसाधन व्यवस्थापन (क्ठ), उड्ठ, पुनर्वसन, समुदाय विकास, शासकीय व निमशासकीय प्रकल्प तसेच संशोधन व प्रशिक्षण अशा विविध क्षेत्रांमध्ये समाजकार्याच्या विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

विद्यार्थ्यांनी पदवीसोबतच संवाद कौशल्य, समुपदेशन कौशल्य, अहवाल लेखन, संगणकाचे ज्ञान, क्षेत्रीय अनुभव, टीमवर्क आणि समस्या सोडविण्याची क्षमता विकसित करण्याची गरज असल्याचे मार्गदर्शन करण्यात आले. तसेच क्षेत्रकार्य व इंटर्नशिपकडे केवळ अभ्यासक्रमाचा भाग म्हणून न पाहता, भविष्यातील करिअरची तयारी म्हणून पाहावे, असे आवाहन करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शकांनी आपल्या समाजकार्याच्या शैक्षणिक व व्यावसायिक प्रवासातील अनुभव विद्यार्थ्यांसमोर मांडत, शिक्षणातून मिळालेले ज्ञान प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात कसे उपयोगी पडते, याची उदाहरणांसह माहिती दिली.

विशेष म्हणजे, ज्या समाजकार्य विद्यालयात त्यांनी विद्यार्थी म्हणून शिक्षण घेतले, त्याच संस्थेत आज मार्गदर्शक म्हणून विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची संधी मिळाल्याने हा प्रसंग भावनिक आणि प्रेरणादायी ठरला. आपल्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त (पान ३ वर)

## जालना जिल्ह्यात केंद्रीय पथकाकडून दुष्काळसदृश परिस्थितीची पाहणी; ८० टक्के पंचनामे आठवडाभरात पूर्ण करणार : जिल्हाधिकारी आशिमा मित्तल



जालना/प्रतिनिधी : जिल्ह्यात पर्जन्यमानात झालेल्या घटमुळे निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीची थेट शेतावर जाऊन पाहणी करण्यासाठी केंद्र सरकारच्या विशेष पथकाने जालना जिल्ह्याचा दौरा केला. या दौऱ्यादरम्यान बदनापूर तालुक्यातील नानेगाव व किनगाव वाडी, तसेच अंबड तालुक्यातील जामखेड येथील शेतीची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली.

केंद्रीय पथकाने शेतातील पिकांची सद्यस्थिती, कमी पावसामुळे पिकांवर झालेला गंभीर परिणाम आणि भूगर्भातील पाणीसाठ्याची स्थिती यांची बारकाईने पाहणी केली. याशिवाय पथकाने स्थानिक शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून त्यांच्या अडचणी व समस्या जाणून घेतल्या.

दरम्यान, जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थिती आणि पिकांच्या नुकसानीबाबत माहिती देताना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सांगितले की, जिल्ह्यात आतापर्यंत ६५ टक्के पंचनामे पूर्ण झाले आहेत. उर्वरित पंचनाम्यांचे काम वेगाने सुरू असून येत्या आठवडाभरात ते पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. पंचनामे पूर्ण झाल्यानंतर नुकसानीचा सवि (पान ३ वर)

## देवगिरी ग्लोबल इंग्लिश स्कूलची आराध्या डोंबाळे महानिबंध स्पर्धेत द्वितीय एक हजार रुपयांचे पारितोषिक, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरव

परतूर : महेशभैया यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या महानिबंध स्पर्धेत देवगिरी ग्लोबल इंग्लिश स्कूलची विद्यार्थिनी आराध्या राहुल डोंबाळे हिने द्वितीय क्रमांक पटकावत घवघवीत यश संपादन केले. तिच्या या यशामुळे शाळेच्या शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील यशात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल आराध्या डोंबाळे हिचा सन्मानचिन्ह, एक हजार रुपये रोख पारितोषिक आणि पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. संस्थेचे संचालक सुबोध भैय्या चव्हाण, लालबहादूर शास्त्री प्राथमिक शाळा, मोंढा, परतूरचे मुख्याध्यापक अशोक तनपुरे सर आणि सहशिक्षक सुनील सुरुंग सर यांच्या हस्ते हा सत्कार




करण्यात आला.

विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या लेखनकौशल्याला व कल्पनाशक्तीला वाव मिळावा, तसेच त्यांच्यामध्ये वाचन, लेखन आणि वैचारिक अभिव्यक्तीची आवड निर्माण व्हावी, यासाठी अशा स्पर्धा महत्त्वपूर्ण ठरतात. महानिबंध स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवून आराध्याने आपल्या गुणवत्तेची छाप उमटवली आहे. तिच्या या यशाचे शैक्षणिक वर्तुळातून कौतुक होत आहे.

या सत्कारप्रसंगी संस्थेचे संचालक सुबोध चव्हाण, मुख्याध्यापक अशोक तनपुरे, सहशिक्षक सुनील सुरुंग, श्रीमती वंदना ककरिया, श्री गजानन कुकडे, पालकवर्ग तसेच आराध्याची पालक व शिक्षिका श्रीमती अश्विनी डोंबाळे यांची उपस्थिती होती.

आराध्या हिने मिळविलेल्या यशाबद्दल उपस्थितांनी तिचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तिच्या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही विविध स्पर्धांमध्ये सहभागी होऊन आपले कौशल्य सिद्ध करण्याची प्रेरणा मिळणार आहे.

## दुबार पेरणी, एकरी २३ हजारांचा खर्च; तरीही पीक हातचे गेले नानेगावात केंद्रीय पथकाची पाहणी; दुष्काळाने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले, शंभर टक्के नुकसानीचे चित्र

नवनाथ गव्हाणे / बदनापूर : पावसाच्या सुरुवातीच्या आशेवर पेरणी केली, पावसाने खंड दिल्याने दुबार पेरणीचे संकट ओढवले, बियाणे, मशागत आणि कीटकनाशकांच्या फवारण्यांवर हजारो रुपये खर्च केले; मात्र एवढी धडपड करूनही हातात पीक येण्याची आशा मावळली आहे. दुष्काळाच्या तीव्र झळांनी शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले असून, या विदारक परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी केंद्रीय पथकाने बदनापूर तालुक्यातील नानेगाव येथे केली.

दुष्काळी परिस्थिती आणि पिकांच्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी आलेल्या केंद्रीय पथकाने शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. यावेळी राज्याचे कृषी सचिव परिमल सिंग, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल आ.नारायण कुंचे, यांच्यासह महसूल, कृषी व अन्य संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

### एकरी २२ ते २३ हजारांचा खर्च; उत्पन्नाची मात्र शाश्वती नाही!

पथकाने शेतकरी अभिजित चव्हाण यांच्या तूर पिकाची पाहणी करून पिकांची सद्यस्थिती आणि नुकसानीची तीव्रता जाणून घेतली. पावसाच्या सुरुवातीला चांगले उत्पादन मिळेल, या अपेक्षेने शेतकऱ्यांनी पेरणी केली होती. मात्र, पावसाने दीर्घ खंड दिल्याने पिकांची वाढ खुंटली आणि अनेक शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ आली.

‘ग्रीन गोल्ड’ या सोयाबीनच्या वाणाची पेरणी केलेल्या शेतकऱ्यांनी बियाणे, मशागत आणि कीटकनाशकांच्या फवारण्यांसाठी मोठी गुंतवणूक केली. चार वेळा फवारणी करूनही पीक वाचविण्यात



यश आले नाही. एका एकरासाठी आतापर्यंत सुमारे २२ ते २३ हजार रुपये खर्च झाल्याची माहिती शेतकऱ्यांनी पथकाला दिली. एवढा खर्च करूनही अपेक्षित उत्पादन मिळण्याची शक्यता धूसर झाल्याने शेतकरी हतबल झाले आहेत.

> दुबार पेरणी आणि फवारण्यांवर एकरी २२ ते २३ हजार रुपये खर्च करूनही पावसाअभावी पीक हातचे गेले आहे. हातात उत्पन्न नसताना कर्जफेड, कुटुंबाचा उदरनिर्वाह आणि जनावरांसाठी चारा-पाण्याची व्यवस्था करणेही कठीण झाले आहे. शासनाने नुकसानीची दखल घेऊन शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी. – संतोष वरकड (शेतकरी)

### शंभर टक्के नुकसान; कर्ज फेडायचे कसे?

पिकांना चांगल्या शेंगा लागून भरघोस उत्पादन मिळेल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांना होती. मात्र, पावसाअभावी पिके वाळून गेल्याने उत्पादनात मोठी घट होण्याची भीती निर्माण झाली आहे. पाहणीदरम्यान काही ठिकाणी पिकांचे जवळपास १०० टक्के नुकसान झाल्याचे निदर्शनास आले. शेतीसाठी बँकेकडून घेतलेले कर्ज, पिकांसाठी केलेली मोठी गुंतवणूक आणि त्यानंतरही पदरी पडणारे नुकसान यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. काही शेतकऱ्यांनी शेतीत पैसा उभा करण्यासाठी दागिने बँकेत गहाण ठेवून कर्ज घेतल्याचेही संवादातून समोर आले. आता कर्जाची परतफेड कशी करायची, मुलांचे शिक्षण आणि मुलींचे विवाह कसे पार पाडायचे, कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा, असे अनेक प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभे आहेत.

### प्रशासकीय यंत्रणेची उपस्थिती; शेतकऱ्यांच्या नजरा मदतीकडे

या पाहणीवेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, बदनापूरच्या उपविभागीय अधिकारी लता बागुल, आ. नारायण कुचे,तहसीलदार एस. एन. हांदेश्वर, पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त,गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी यांच्यासह तलाठी, मंडळ अधिकारी आणि ग्रामसेवक उपस्थित होते.

केंद्रीय पथकाने प्रत्यक्ष शेतात जाऊन पिकांची स्थिती तपासली आणि शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. या पाहणीमुळे बदनापूर तालुक्यातील दुष्काळाची तीव्रता आणि शेतकऱ्यांवरील आर्थिक संकटाचे वास्तव समोर आले आहे. दुबार पेरणीपासून ते पिकांच्या नुकसानीपर्यंतचा संपूर्ण आर्थिक भार सहन करणाऱ्या शेतकऱ्यांना आता ठोस मदतीची अपेक्षा आहे. प्रत्यक्ष (पान ३ वर)

# संपादकीय

## नानाची स्वतंत्र ओळख

आजच्या काळात चित्रपटसृष्टीत तंत्रज्ञान झपाट्याने बदलत आहे. भव्य सेट, अत्याधुनिक दृश्य परिणाम आणि मोठ्या प्रमाणावर होणारी निर्मिती यामुळे चित्रपटाचे स्वरूप बदलले आहे. तरीही प्रेक्षकांना शेवटी जोडून ठेवतो तो कलाकाराचा खरा अभिनय. या संदर्भात नाना पाटेकर यांचे काम अधिक महत्त्वाचे वाटते. त्यांनी सिद्ध केले की प्रभावी अभिनयासाठी केवळ मोठी दृश्ये किंवा भव्य संवाद आवश्यक नसतात; कलाकाराची प्रामाणिकता आणि व्यक्तिरेखेशी असलेली नाळ महत्त्वाची असते.

नाना पाटेकर यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विचार करताना त्यांच्या सामाजिक जाणिवेकडेही दुर्लक्ष करता येणार नाही. प्रसिद्धीच्या झोतात असूनही सामान्य माणसाच्या प्रश्नांशी जोडलेले राहण्याचा त्यांचा प्रयत्न दिसतो. शेतकऱ्यांच्या समस्या, ग्रामीण भागातील अडचणी आणि सामाजिक प्रश्न याबद्दल त्यांनी व्यक्त केलेली भूमिका अनेकदा चर्चेत आली आहे. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वात कलाकार आणि सामाजिक जाणीव असलेला नागरिक हे दोन्ही पैलू दिसून येतात.

नाना पाटेकर म्हणजे केवळ एक नाव नाही; ती अभिनयातील एक शैली आहे, एक वेगळा आवाज आहे आणि वास्तवाला भिडण्याची एक पद्धत आहे. त्यांच्या कारकिर्दीकडे पाहताना जाणवते की खरा कलाकार आपल्या भूमिकांपेक्षा मोठा असतो. तो आपल्या कलेतून काळावर ठसा उमटवतो आणि पुढच्या पिढ्यांसाठी एक उदाहरण निर्माण करतो.

म्हणूनच नाना पाटेकर यांच्या कलाप्रवासाला सलाम करताना त्यांच्या अभिनयातील प्रामाणिकपणा, सामाजिक संवेदनशीलता आणि कलेशी असलेली बांधिलकी यांचे स्मरण करणे आवश्यक आहे. त्यांनी साकारलेल्या व्यक्तिरेखा आणि त्यांनी दिलेले संवाद प्रेक्षकांच्या स्मरणात दीर्घकाळ राहतील. अभिनयाच्या माध्यमातून माणूस, समाज आणि वास्तव यांचे दर्शन घडवणाऱ्या या असामान्य कलाकाराला मनःपूर्वक सलाम! भारतीय चित्रपटसृष्टीत अनेक अभिनेते आले, अनेकांनी आपल्या अभिनयाने प्रेक्षकांचे मनोरंजन केले; परंतु काही कलाकार असे असतात की, ते केवळ पडद्यावर भूमिका साकारत नाहीत, तर त्या भूमिकेला स्वतःचे अस्तित्व देतात. त्यांच्या संवादातून, चेहऱ्यावरील भावातून, देहबोलीतून आणि शांततेतूनही काहीतरी बोलत राहतात. नाना पाटेकर हे अशाच असामान्य कलाकारांपैकी एक नाव आहे. त्यांच्या अभिनयाचा विचार केला की डोळ्यांसमोर येते ती एक विशिष्ट प्रतिमा–दमदार आवाज, धारदार संवादफेक, वास्तवाला भिडणारा अभिनय आणि कोणत्याही भूमिकेला जिवंत करण्याची विलक्षण ताकद.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे स्पष्टवक्तेपणा. पडद्यावर जसा त्यांचा आवाज ठाम असतो, तसाच त्यांच्या सार्वजनिक व्यक्तिमत्त्वातही स्पष्टपणा जाणवतो. ते समाजातील अनेक प्रश्नांवर आपली मते मांडताना दिसले आहेत. शेतकरी, जवान, गरिबी, सामाजिक विषमता आणि सामान्य माणसाचे प्रश्न यांविषयी त्यांनी वेळोवेळी संवेदनशीलता व्यक्त केली आहे. त्यामुळे नाना पाटेकर यांच्याकडे केवळ ‘अभिनेता’ म्हणून पाहणे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला मर्यादित चौकटीत बंदिस्त करण्यासारखे ठरेल.

नाना पाटेकर यांच्या कलाप्रवासात रंगभूमीचेही महत्त्व मोठे आहे. रंगभूमीने त्यांना अभिनयाची शिस्त, संवादातील वजन आणि व्यक्तिरेखेचा सखोल अभ्यास करण्याची दृष्टी दिली. पुढे चित्रपटसृष्टीत त्यांनी या अनुभवाचा प्रभावी वापर केला. रंगभूमी आणि चित्रपट या दोन्ही माध्यमांमध्ये काम करताना त्यांनी लोकप्रियतेपेक्षा भूमिकेची ताकद महत्त्वाची मानली. म्हणूनच त्यांच्या अभिनयाला केवळ स्टारडमचा आधार नाही; त्यामागे मेहनत, अनुभव आणि कलेबद्दलची बांधिलकी आहे.

त्यांच्या अभिनयातील आणखी एक उल्लेखनीय गोष्ट म्हणजे त्यांच्या डोळ्यांतून व्यक्त होणाऱ्या भावना. अनेकदा संवादापेक्षा त्यांचा चेहरा अधिक बोलतो. एखाद्या प्रसंगात ते शांत उभे राहिले तरी प्रेक्षकांच्या मनात अस्वस्थता निर्माण होते. त्यांच्या आवाजात राग असेल तर तो अंगावर येतो; वेदना असेल तर ती मनाला भिडते; आणि विनोद असेल तर तो सहज हसू आणतो. अभिनयातील ही भावनिक ताकद प्रत्येक कलाकाराला साध्य होत नाही.

नाना पाटेकर यांचे योगदान केवळ पुरस्कार किंवा प्रसिद्धीच्या मोजपट्टीने मोजता येणार नाही. एका कलाकाराने समाजावर, प्रेक्षकांच्या भावविश्वावर आणि चित्रपटातील अभिनयाच्या शैलीवर किती प्रभाव टाकला, हे अधिक महत्त्वाचे असते. नानांनी आपल्या कामातून अनेक पिढ्यांना प्रभावित केले. त्यांच्या संवादांची नक्कल झाली, त्यांच्या व्यक्तिरेखा चर्चिल्या गेल्या आणि त्यांच्या अभिनयशैलीचा अभ्यासही केला गेला. मात्र त्यांची खरी ताकद नक्कल करण्यात नाही, तर त्यांनी निर्माण केलेल्या अस्सलपणात आहे. नाना पाटेकर यांनी आपल्या अभिनय कारकिर्दीत विविध प्रकारच्या भूमिका साकारल्या. खलनायक असो, पोलीस अधिकारी असो, सैनिक असो, सामान्य माणूस असो किंवा अंतर्मुख आणि भावनिक व्यक्तिरेखा असो–प्रत्येक भूमिकेत त्यांनी स्वतःची वेगळी छाप निर्माण केली. त्यांच्या अभिनयात कृत्रिमपणा जाणवत नाही. ते भूमिका ‘करताना’ दिसत नाहीत; उलट ते त्या व्यक्तिरेखेच्या जगण्यात पूर्णपणे सामावून जातात. म्हणूनच त्यांच्या भूमिका केवळ चित्रपटातील प्रसंग राहत नाहीत, तर प्रेक्षकांच्या स्मरणात कायमच्या कोरल्या जातात.

नाना पाटेकर यांच्या अभिनयाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील वास्तववाद. त्यांच्या संवादफेकीत नाटकीपणा असला तरी तो कधीही खोटा वाटत नाही. त्यांच्या आवाजातील चढ–उतार, चेहऱ्यावरील राग, वेदना, असहायता किंवा प्रेम–हे सर्व इतके नैसर्गिक वाटते की प्रेक्षक त्या व्यक्तिरेखेच्या भावविश्वात सहज ओढला जातो. ‘क्रांतिवीर’, ‘परिंदा’, ‘अग्निसाक्षी’, ‘अब तक छप्पन’, ‘वेलकम’ यांसारख्या विविध धाटणीच्या चित्रपटांमधून त्यांच्या अभिनयाची व्याप्ती स्पष्ट होते. गंभीर भूमिका असो किंवा विनोदी भूमिका, नाना पाटेकर यांनी प्रत्येक भूमिकेला आपली स्वतंत्र ओळख दिली.

# देशाचे क्रांतिवीर नटसम्राट व युवकांना नवी दिशा देणारे महान युगपुरुष;नाना पाटेकर

दिनांक ८ ऑक्टोबर २०२६ ला अचानक नाना पाटेकर यांची प्राणज्योत मावळली व नाना नावाचं वादळ एकाएकी शांत झाले.यामुळे सर्वत्र शोककळा पसरली.नाना पाटेकर यांचे कार्य ना भुतो ना भविष्यती अशाप्रकारचे आहे. कारण त्यांच्या प्रत्येक चित्रपटातुन कुठे क्रांतीची ज्योत, शिक्षणाचा प्रवाह, सर्वसामान्यांच्या समस्या, अत्याचार व भ्रष्टाचाराविरुद्धचा लढा धगधगतांना दिसत होता. त्यांची चित्रपटसृष्टीत काम करण्याची शैली आगळीवेगळी होती त्यामुळे त्यांचा स्वभाव शांत जरी असला तरी त्यांची कार्यशैली आक्रमक स्वरूपाची होती.कारण त्यांच्या चित्रपटातील डॉयलॉग,हावभाव अविस्मरणीय होत्या. त्यामुळे प्रेक्षकांचे मन ताबडतोब जिंकण्याची क्षमता त्यांच्यात अफाट असल्याने महाराष्ट्रासह संपूर्ण देश त्यांच्यावर प्रेम करायचा त्यामुळे त्यांचे आतापर्यंतचे संपूर्ण कार्य वाखाणण्याजोगे आहेत नाना पाटेकर देशाचे सुप्रसिद्ध अभिनेता व नटसम्राट होते खरे परंतु त्यांचे रहाणीमान अत्यंत साध्यापणाचे होते त्यांच्यात कोणत्याही प्रकारचा गर्व किंवा घमंड किंवा द्वेषभावना असा कोणताही प्रकार त्यांच्यात नव्हता.त्याच्या प्रत्येक चित्रपटातुन देशभक्तीची ज्वाला, आपुलकी भावना,समानतेची जोत व एकतेचे प्रतीक संपूर्ण देशभर हवेसारखे पसरले होते.त्यामुळे आज त्यांच्या निधनाने संपूर्ण देश शोकाकुल झाला आहे.त्यांचा सर्वात जास्त भर सामाजिक संस्थांना भेट देऊन त्यांना आर्थिक मदत करून समाज कार्य करायचे व त्यांच्या अडीअडचणी जाणून घेणे आणि गोरगरीबांची सेवा करणे हा होता. नानाजी राजकारणापासुन कोसो दूर राहून समाज कार्य करायचे. समाजकार्याच्या माध्यमातून त्यांनी राज्यासह देशातील संपूर्ण राजकीय पुढाऱ्यांना मन जिंकले व आपलेसे केले.त्यामुळे देशातील प्रत्येक राजकीय पुढारी नाना पाटेकरांचा मानसन्मान करायचे. त्याचप्रमाणे नेहमीच गावखेडे,सामाजिक संस्था, अतिदुर्गम भाग अशा ठिकाणी नेहमीच भेट देऊन देश सेवा करीत असल्याने महाराष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीला आपलेसे करून घेतले होते.मिडियाच्या माध्यमातून त्यांनी राज्यासह देशवासीयांशी अनेकदा संवाद सुध्दा साधला व देशवासीयांना आपलसं करून घेतले.कारण त्यांचे मार्गदर्शन नेहमीच समाज हिताचे व देश हिताचे रहाचे.परंतू सुप्रसिद्ध अभिनेता नाना पाटेकर अचानक आपल्यातून गेल्याने सर्वांना मार्गदर्शन करणारा आणि शिकवण




देणारा नटसम्राट आज पडद्याआड गेला व संपूर्ण देश शोकाकुल झाला आहे .कारण त्यांच्या प्रत्येक शब्दात अमृतवाणी,सत्यता आणि बांधिलकी होती.कुठे कोणाला कसे ट्रीक करायचे ही सटीक कला आणि शैली त्यांना चांगलीच अवगत होती.नाना पाटेकरांनी आपल्या धारदार शैलीतून अनेक ज्वलंत प्रश्नांना व शेतकऱ्यांच्या प्रश्नांना सडेतोडपणे मिडिया समोर मांडून आणि सरकार व प्रशासनाशी संवाद साधून सोडविले सुध्दा आहेत.कारण त्यांच्या कार्यशैलीचा मुख्य उद्देश होता की,बाप दाखव नाही तर श्राद्ध करअशा पध्दतीने अनेक प्रश्न सडेतोडपणे मांडून समाज

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
स्वतंत्र पत्रकार
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

जागृती व सरकारला जागे करण्याचे ते नेहमीच काम करायचे आणि त्यांचे ध्येय एकच होते ते म्हणजे खरेपणा यामुळेच ते चित्रपटसृष्टीत व सामाजिक क्षेत्रात एवढा मोठा शिखर गाठू शकेल.महत्वाचे म्हणजे फिल्मफेअरच्या इतिहासात सर्वो त्कृष्ट अभिनेता, सहाय्यक अभिनेता आणि खलनायक अशा तीनही महत्त्वाच्या श्रेणीमध्ये पुरस्कार जिंकणारे ते एकमेव अभिनेता होते;तर मराठीत नटसम्राट चित्रपटांतील त्यांच्या अजरामर भूमिकेसाठी त्यांना फिल्मफेअर मराठीचा सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार मिळाला आहे.परंतु नाना नावाचं वादळ अचानक शांत झाल्याने संपूर्ण चित्रपटसृष्टीचा अभिनय,संवेदनशीलतेचा भारदस्त चेहरा आणि सामाजिक बांधिलकीची भिंत कोसळल्याने महाराष्ट्रासह संपूर्ण देश आज दुःखच्या छायेत दिसून येतो.स्वर्गीय नटसम्राट जेष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली व यांच्या आत्म्याला शांती मिळो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

जय हिंद!

# मुंबईतील रामलीलेला मिळणार भव्य रंगमंचीय रूप; ११ ते २० ऑक्टोबर दरम्यान गिरगाव चौपाटीवर रंगणार आदर्श रामलीला महोत्सव २०२६



मुंबई : सन १९६४ पासून रामलीलेची परंपरा अखंडपणे जपणारी श्री आदर्श रामलीला महोत्सव समिती यंदा मुंबईतील गिरगाव चौपाटीवर ‘आदर्श रामलीला महोत्सव २०२६’ भव्य आणि आधुनिक रंगमंचीय स्वरूपात सादर करण्यासाठी सज्ज झाली आहे. ११ ते २० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत दहा दिवस चालणाऱ्या या महोत्सवात रामायणातील विविध प्रसंगांची नाट्यमय मांडणी, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि पारंपरिक सांस्कृतिक सादरीकरणाचा अनुभव प्रेक्षकांना घेता येणार आहे. महोत्सवाची माहिती देण्यासाठी ७ ऑक्टोबर रोजी गिरगाव चौपाटी येथे विशेष पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी रामलीलेचे लेखक व दिग्दर्शक योगेश व्ही. पगारे, संगीत दिग्दर्शक मोंटी शर्मा, समितीचे सचिव व विश्वस्त कानबिहारी अग्रवाल, अध्यक्ष व विश्वस्त राजेंद्र अग्रवाल तसेच विश्वस्त व कोषाध्यक्ष वैभव गुप्ता यांनी माध्यमांशी संवाद साधला. यंदाच्या रामलीलेची संकल्पना, सादरीकरणाची वैशिष्ट्ये आणि प्रेक्षकांसाठी करण्यात आलेल्या विशेष तयारीची माहिती त्यांनी दिली. यावेळी कलाकारांनी रामलीलेतील एक विशेष प्रसंग माध्यमांसमोर थेट सादर करून आगामी महोत्सवाची झलक दाखवली. भव्य रंगमंच, अत्याधुनिक तंत्रज्ञानाची जोड डिविनिटी प्रॉडक्शन्सची निर्मिती असलेली यंदाची रामलीला एका भव्य रंगमंचीय प्रयोगाच्या स्वरूपात साकारण्यात येत आहे. पारंपरिक रामलीलेचा सांस्कृतिक वारसा जपत त्याला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्याचा प्रयत्न या सादरीकरणातून करण्यात आला आहे. सुमारे १,५०० प्रेक्षकांची क्षमता असलेले कव्हर्ड जर्मन हँगर ऑडिटोरियम हे यंदाच्या महोत्सवाचे प्रमुख आकर्षण असेल. याशिवाय तब्बल ६४ फूटांचा भव्य एचडी एलईडी व्हिज्युअल बॅकड्रॉप, अत्याधुनिक प्रकाशयोजना व ध्वनिव्यवस्था, आकर्षक नेपथ्य आणि विशेष तयार करण्यात आलेली पारंपरिक



वेशभूषा यांमुळे रामायणातील प्रसंग अधिक प्रभावीपणे सादर करण्याची तयारी करण्यात आली आहे. या भव्य निर्मितीमध्ये ५० हून अधिक कलाकार सहभागी होणार आहेत. कलाकारांचे अभिनय, संगीत, प्रकाशयोजना, ध्वनी आणि दृश्यात्मक परिणाम यांच्या माध्यमातून रामायणातील महत्त्वपूर्ण प्रसंग रंगमंचावर साकारले जाणार आहेत. परंपरा आणि आधुनिकतेचा संगम गेल्या सहा दशकांहून अधिक काळ रामलीलेची परंपरा जपणाऱ्या श्री आदर्श रामलीला महोत्सव समितीसाठी यंदाचा महोत्सव विशेष महत्त्वाचा ठरणार आहे. धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचे जतन करत नव्या पिढीपर्यंत रामायणातील कथा पोहोचविणे, हा अशा सादरीकरणामागील महत्त्वाचा उद्देश आहे. भव्य रंगमंचीय मांडणी, आधुनिक दृश्यतंत्रज्ञान आणि पारंपरिक कलाविष्कार यांच्या संगमातून गिरगाव चौपाटीवरील रामलीला प्रेक्षकांसाठी एक वेगळा अनुभव ठरण्याची अपेक्षा आहे. मुंबईतील नागरिकांसह रामलीला पाहण्यासाठी उत्सुक असलेल्या रसिकांना या दहा दिवसांच्या महोत्सवात सहभागी होता येणार आहे.

# बुलढाण्याचे सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक शेख अस्लम शेख हमीद यांना राष्ट्रपती पदक प्रदान



बुलढाणा पोलीस दलातून एक अत्यंत अभिमानास्पद बातमी समोर येत आहे. आज दिनांक ०९ ऑक्टोबर २०२६ रोजी, राजभवन येथे आयोजित एका विशेष कार्यक्रमात महाराष्ट्राचे मा. राज्यपाल श्री जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते बुलढाणा पोलीस दलातील सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक श्री. शेख अस्लम शेख हमीद यांना सन्मानित करण्यात आले. पोलीस दलातील त्यांच्या दीर्घ आणि उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांना देशाचा सर्वोच्च मानला जाणारा ’राष्ट्रपती पदक’ देऊन गौरविण्यात आले आहे.

या उल्लेखनीय यशामुळे शेख अस्लम शेख हमीद यांच्यावर त्यांचे नातेवाईक, मित्रपरिवार आणि पोलीस वर्तुळातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. दरम्यान, राष्ट्रपती पदकाने सन्मानित झालेले शेख अस्लम शेख हे ’दैनिक तेजस एक्सप्रेस’चे संपादक शेख उमर (बबलू भाई) यांचे मोठे बंधू आहेत. पोलीस दलातील त्यांच्या या उत्तुंग कामगिरीमुळे बुलढाणा जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

# उपसमितीच्या बैठकीत OBC समाजाच्या मागण्यांवर चर्चा, सरकारकडून सकारात्मक निर्णयाचे आश्वासन

मुंबई: मंत्रालयामध्ये आज झालेल्या मंत्रीमंडळ उपसमितीच्या बैठकीमध्ये अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यातील ओबीसी विद्यार्थ्यांसाठीच्या अनेक मागण्यांवर चर्चा करण्यात आली. ओबीसी विद्यार्थ्यांसाठी राज्यामध्ये वसतीगृहांची व्यवस्था करावी यासाठी आणखीन नवीन १०० वस्तीगृहे बांधण्यात यावे, अशी उपसमितीच्या सदस्यांकडून मागणी करण्यात आली. सोबतच, विभागीय स्तरावरील वसतीगृहांची संख्या एक हजारापर्यंत वाढवावी, महाज्योतीला एक हजार कोटी रुपये द्यावे शिवाय, मेंढपाळ, वनवासी आणि अठरापगड जातीतील लोकांच्या विविध समस्या सोडविण्यात याव्यात अशा मागण्या उपसमितीसमोर मांडण्यात आल्या. उपसमितीच्या बैठकीतील सर्व मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन यावेळी मंत्रीमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. बैठकीसाठी मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह बैठकीला अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, वनमंत्री गणेश नाईक, पर्यावरण व वातावरण बदल मंत्री पंकजा मुंडे, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, मृदा व जलसंधारण मंत्री संजय राठोड, माजी मंत्री विजय वडेट्टीवार, ड. मंगेश ससाणे आणि ओबीसी नेते लक्ष्मण हाके उपस्थित होते. ओबीसी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवरून विजय वडेट्टीवार यांनी अनेक महत्त्वाच्या मागण्या केल्या. वसतिगृहे खाजगी तत्त्वावर न चालवता त्या शासनाच्या संबंधित विभागानेच चालवावीत आणि सामाजिक न्याय विभागाच्या धर्तीवर ओबीसी विद्यार्थ्यांनाही उच्च दर्जाच्या वसतिगृह आणि इतर शैक्षणिक सवलती मिळाल्या पाहिजेत, अशी सुद्धा वडेट्टीवारांनी मागणी केली. शासकीय योजनांचा लाभ अकरावीपासून थेट मिळावा आणि विद्यार्थ्यांना भविष्य निर्वाह भत्ता लागू करावा, अशी मागणी देखील समितीने केली. व्यावसायिक आणि बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी ओबीसी विद्यार्थ्यांना शंभर टक्के शिष्यवृत्ती देण्यात यावी, लोकसंख्येच्या प्रमाणात फेलोशिपच्या जागा वाढवाव्यात आणि ’महाज्योती’ या संस्थेला किमान एक हजार कोटी रुपयांचा निधी द्यावा, अशी समान न्यायाची भूमिका वडेट्टीवार यांनी मांडली वसतिगृहांसाठी जागा उपलब्ध करण्याबाबतही बैठकीत सविस्तर आढावा घेण्यात आला. सध्या नऊ ठिकाणी जागा मिळाल्या असून, दुग्धविकास विभागाच्या १३ व अन्य ११ जागा, तसेच महसूल विभागाच्या १६ जागा वसतिगृहांसाठी उपलब्ध करून देण्याबाबत चर्चा झाली. तसेच, कोणत्या १६ जिल्ह्यांमध्ये तातडीने जागा उपलब्ध करून द्यावयाच्या आहेत, याबाबतही बैठक आयोजित करण्याच्या सूचना महसूलमंत्री बावनकुळे यांनी केल्या. ओबीसी समाजाच्या विविध प्रश्नांवर ड. मंगेश ससाणे यांनीही महत्त्वपूर्ण मुद्दे मांडले. बाठिया कमिशनच्या अहवालानुसार ग्रामपंचायतीच्या २२,००० जागा कमी झाल्याने ओबीसींचे सात ते आठ टक्के आरक्षण कमी होण्याची भीती आहे, त्यामुळे राज्य सरकारने याबाबत तातडीने रिव्ह्यू घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली. यासोबतच ओबीसी आंदोलनातील कार्यकर्त्यांवरील गुन्हे मागे घेण्यात यावेत, ’राष्ट्रपिता ते राष्ट्रनेता’ अभियान वर्षभर राबवावे आणि कुणबी दाखल्यांच्या प्रश्नावर तोडगा काढावा, असे ससाणे म्हणाले. लक्ष्मण हाके यांनीही उपसमितीसमोर आपल्या मागण्या मांडताना, ओबीसी महामंडळे केवळ कागदोपत्री न ठेवता ती तातडीने प्रत्यक्ष कार्यान्वित करावीत, अशी आग्रही मागणी केली. मंत्री गणेश नाईक यांनी सर्व जातींना समान निधी देण्यात यावा आणि अगोदरचा सर्व अनुशेष (बॅकलॉग) भरून काढल्यानंतरच पुढील नियोजन करावे, अशी भूमिका मांडली. बैठकीच्या शेवटी मंत्री छगन भुजबळ यांनी पुण्यात म. फुले यांचा वाडा आणि त्यापासून ३०० मीटर अंतरावर असलेले क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे संरक्षित स्मारक यांना जोडण्याचा आराखडा तयार करावा, अशी मागणी केली. तसेच, शासकीय नोकरभरतीमध्ये ओबीसी समाजाची भरती अत्यंत कमी प्रमाणात होत असल्याबाबत चिंता व्यक्त करत, सर्व विभाग प्रमुखांना या बैठकीच्या माध्यमातून स्पष्ट सूचना देण्यात याव्यात, अशा सूचनाही मंत्री भुजबळ यांनी दिल्या.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक शामसुंदर चितोडा यांनी **जगमित्र ऑफसेट भोकरदन नाका, संभाजीनगर ता.जि.जालना ४३१२०३ (महाराष्ट्र)** येथे छापून, दैनिक चकमक कार्यालय जालना येथे प्रसिध्द केले. पि.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी ※ यांची राहील. **संपादक शामसुंदर चितोडा, कार्यकारी संपादक कैलास फुलारी** (जालना जिल्हा न्यायालयाअंतर्गत) RNI NO.MHMAR/26/A4110 **मो.न.९४२२७९६०८८, ९४०३४९४४२२**

# आंतरराष्ट्रीय वृद्ध व्यक्ती दिनानिमित्त मांदळा येथे ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

**किशोर मोरे /घनसावंगी** : :तालुक्यातील मांदळा येथे संत रामदास कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, घनसावंगी, येथील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय वृद्ध व्यक्ती दिनानिमित्त शुक्रवार, दि. ९ ऑक्टोबर २०२६ रोजी मांदळा येथे ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात एकूण ७५ रुग्णांची आरोग्य तपासणी करून त्यांना आवश्यक औषधोपचार करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच परमेश्वर खैरे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्राथमिक आरोग्य केंद्र तीर्थपुरी येथील आरोग्य अधिकारी डॉ. अश्विनी नाकाडे, उपकेंद्र बोडखा येथील समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. अंजुम शेख, श्रीमती संजना मोरे आरोग्य सेविका, श्रीमती परविन शेख सुपरवायझर तसेच आरोग्य सेवक श्री. किरण पंडित, श्री. सिद्धार्थ देवके आणि श्री. शुभम बुलबुले यांनी आरोग्य तपासणी व उपचारासाठी विशेष योगदान दिले.

या शिबिरामध्ये गावातील ज्येष्ठ नागरिक महिला व पुरुषांची आरोग्य तपासणी करण्यात आली. त्यामध्ये रक्तदाब, रक्तातील साखर, हिमोग्लोबिन तसेच विविध प्रकारच्या रक्त तपासण्या करण्यात आल्या. गरजेनुसार अनेक ज्येष्ठ नागरिकांची ईसीजी (एउत्र) तपासणीही करण्यात आली. तपासणीनंतर आवश्यकतेनुसार रुग्णांना औषधे देण्यात आली.



यावेळी डॉ. अंजुम शेख यांनी उपस्थित ज्येष्ठ नागरिकांना आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. वाढत्या वयानुसार आरोग्याची काळजी घेणे, नियमित आरोग्य तपासणी करणे, संतुलित आहार घेणे आणि डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार औषधोपचार करणे यांचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. गावकऱ्यांच्या वतीने श्री. बद्रीनाथ धबडकर यांनी मनोगत व्यक्त करून ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य शिबिर आयोजित केल्याबद्दल महाविद्यालय व आरोग्य विभागाचे आभार मानले. या कार्यक्रमास सौ. शारदा परमेश्वर खैरे,

सौ. अर्चना बद्रीनाथ धबडकर (उपसरपंच), श्री. विजयकुमार गाडेकर (जिल्हा परिषद शाळा, मांदळा) आणि श्री. किशोर मदन सोनवणे (पोलीस पाटील, मांदळा) यांची उपस्थिती होती. तसेच आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. भाऊसाहेब देवकर, श्री. नरहरी बनसोडे, श्री. अभय दहिवाळ, सौ. सुरेखा धबडकर, श्री. परमेश्वर खैरे, श्री. एकनाथ मानकर, श्री. रामेश्वर खैरे आणि श्री. दिगंबर धबडकर यांच्यासह गावातील ज्येष्ठ नागरिक महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. हे आरोग्य तपासणी शिबिर महाविद्यालयाचे (पान ३ वर)

# वाटूर येथे शूरवीर जिवा महाले यांची जयंती उत्साहात साजरी



वाटूर, बातमीदार : हिंदवी स्वराज्याचे निष्ठावंत शूरवीर योद्धे जिवा महाले यांची जयंती वाटूर येथे उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. वाटूर येथील नाभिक समाज, शूरवीर जिवबा सामाजिक प्रतिष्ठान आणि आधार बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमादरम्यान शूरवीर जिवा महाले यांच्या शौर्य, पराक्रम, निष्ठा आणि स्वराज्याप्रती असलेल्या समर्पणावर प्रकाश टाकणारी भाषणे झाली. प्रतापगडाच्या ऐतिहासिक लढाईत छत्रपती शिवाजी महाराजांच्या रक्षणासाठी जिवा महाले यांनी बजावलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेचे स्मरण करून देण्यात आले. त्यांच्या शौर्याचा आणि त्यागाचा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याची गरज यावेळी व्यक्त करण्यात आली. जिवा महाले यांचा इतिहास गावोगावी पोहोचविणार शूरवीर जिवबा सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने जिवा महाले यांच्या ऐतिहासिक कार्याची माहिती गावोगावी पोहोचविण्यासाठी व्यापक जनजागृती अभियान राबविण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. त्यांच्या शौर्यगाथेतून तरुण पिढीला प्रेरणा मिळावी, ऐतिहासिक वारशाची जपणूक व्हावी आणि समाजात महापुरुषांच्या कार्याविषयी जागरूकता निर्माण व्हावी, हा या उपक्रमामागील उद्देश आहे. या कार्यक्रमाला वाटूर येथील नाभिक समाज (पान ३ वर)

# सावंगी तलान येथील सुपुत्र डॉ.विकास दिलीप राठोड यांची समुदाय आरोग्य अधिकारी सिएचओ पदी निवड

जालना । प्रतिनिधी – जालना तालुक्यातील सावंगी तलान गावचे रहिवासी असलेले व शेतकरी पुत्र तसेच श्रीचंद बाला राठोड यांचे नातू डॉ.विकास दिलीप राठोड यांची समुदाय आरोग्य अधिकारी सिएचओ पदी नुकताच निवड झाली असून,या निवडीबद्दल संपूर्ण सावंगी तलान व परिसरात आनंदाचे वातावरण पहावयास मिळत आहे.कठोर



मेहनत,कष्ट,सातत्यपूर्ण मेहनत आणि आरोग्यसेवेप्रती असलेली निष्ठा यांच्या जोरावर डॉ. विकास राठोड यांनी ही यशस्वी कामगिरी केली आहे.सिएचओ पदावर निवड झाल्यामुळे आता ते ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य सेवा अधिक बळकट करण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहेत.सावंगी तलानच्या ग्रामस्थांनी डॉ. विकास राठोड यांच्या या यशाबद्दल अभिमान व्यक्त केला असून,गावाच्या विकासात आता आरोग्य सेवेचा नवा अध्याय सुरू झाला आहे.गावातील जेष्ठ नागरिक,युवा व महिलांनी त्यांच्या या निवडीबद्दल शुभेच्छा दिल्या आहेत.



पीपल्स रिपब्लिकन पार्टी ता. घनसावंगी जि. जालना तालुका कार्यालयाचे उद्घाटन प्रसंगी जालना जिल्हाध्यक्ष राजेंद्र हिवाळे, जिल्हा महामंत्री एकनाथ जाधव, जिल्हा संघटक शेख शमशुद्दीन, घनसावंगी तालुका अध्यक्ष शिवाजीराव कोळे, परतुर तालुका अध्यक्ष नागोराव प्रधान व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते त्याप्रसंगीचे छायाचित्र.

# सैन्यदलातील अधिकारी पदासाठी इच्छुक युवकांना मोफत पूर्वप्रशिक्षणाची संधी

## नाशिक येथील प्रशिक्षण केंद्रात १९ ते २८ ऑक्टोबरदरम्यान एसएसबी अभ्यासक्रम; जालना जिल्ह्यातील उमेदवारांसाठी १५ ऑक्टोबरला मुलाखत

जालना,दि.९(जिमाका) : भारतीय सैन्यदल, नौदल आणि वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्याची इच्छा असलेल्या युवकांसाठी मोफत पूर्वप्रशिक्षणाची संधी उपलब्ध झाली आहे. सेवा निवड मंडळाच्या (डड्ढ) परीक्षेची पूर्वतयारी करून घेण्यासाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे १९ ते २८ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत एसएसबी अभ्यासक्रम आयोजित करण्यात आला आहे. या प्रशिक्षणासाठी पात्र उमेदवारांना मोफत प्रशिक्षणासह निवास व भोजनाची सुविधाही देण्यात येणार आहे.

निवड झालेल्या प्रशिक्षणार्थींनी केंद्रामध्ये पोहचण्यासाठी दि. १८ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता प्रशिक्षण केंद्रात हजर रहावे. जालना जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांची निवड करण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, जालना येथे १५ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत मुलाखतीसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, जालना यांनी केले आहे.

पात्र उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहावे.

मुलाखतीसाठी येताना उमेदवारांनी Department of Sainik Welfare, Pune (DSW) `m§À`m www.mahasainik.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरील DSW Portal ‘Yrb "Resources - PCTC Nashik - SSB ६७’ या विभागातून प्रवेशपत्र डाउनलोड करावे. संबंधित जिल्हा सैनिक



कल्याण कार्यालयाकडून प्रवेशपत्राची प्रत मिळाल्यास तीही सोबत आणावी. प्रवेशपत्रासोबत नमूद केलेली सर्व आवश्यक कागदपत्रे पूर्ण करून मुलाखतीच्या वेळी सादर करावीत.

या प्रशिक्षणासाठी पुढीलपैकी संबंधित पात्रता असणे आवश्यक आहे.

उउ्ड्ढए-णझड्ढउ किंवा छ्‌ऊ-–णझड्ढउ परीक्षा उत्तीर्ण: कंबाइंड डिफेन्स सर्व्हिसेस एक्झामिनेशन अथवा नॅशनल डिफेन्स अकॅडमी परीक्षा उत्तीर्ण होऊन एसएसबी मुलाखतीसाठी पात्र ठरलेले उमेदवार.

एनसीसी स्पेशल एन्ट्री: एसएसबी मुलाखतीसाठी कॉल लेटर प्राप्त झालेले उमेदवार.

टेक्निकल ग्रॅज्युएट कोर्स: एसएसबी मुलाखतीसाठी कॉल लेटर असलेले उमेदवार.

युनिव्हर्सिटी एन्ट्री स्कीम: एसएसबी कॉल लेटर असलेले किंवा एसएसबीसाठी शिफारस केलेल्या यादीत नाव असलेले उमेदवार. पात्र उमेदवारांनी मुलाखतीच्या वेळी संबंधित पात्रतेची प्रमाणपत्रे व आवश्यक कागदपत्रे सोबत आणावीत. प्रशिक्षणाबाबत अधिक माहितीसाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथील प्रभारी अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. ई-मेल : training.pctcnashik(पान ३ वर)

# शासकीय कार्यालयांत स्वच्छता मोहीम राबविण्याचे निर्देश

## दर आठवड्याच्या पहिल्या कार्यालयीन दिवशी सकाळी १० ते ११ वाजेपर्यंत श्रमदान; अस्वच्छता आढळल्यास कारवाई

जालना/प्रतिनिधी : जिल्ह्यातील शासकीय कार्यालये स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक बनविण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने विशेष स्वच्छता मोहीम राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ‘सेवा संकल्प अभियान – सेवा माझे योगदान’ या मोहिमेंतर्गत दर आठवड्याच्या पहिल्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते ११ या वेळेत एक तास श्रमदान करण्यात येणार आहे. या मोहिमेत जालना जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयांचे विभागप्रमुख, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे निर्देश देण्यात आले आहेत. कार्यालयीन परिसर स्वच्छ ठेवणे, अनावश्यक कागदपत्रांची योग्य विल्हेवाट लावणे आणि कर्मचाऱ्यांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करणे, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. या मोहिमेंतर्गत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपले टेबल, खुर्ची, कपाट, संगणक आणि



इतर कार्यालयीन साहित्य स्वच्छ ठेवावे. अनावश्यक व कालबाह्य कागदपत्रे आणि फाईल्सचे शासनाच्या नियमांनुसार वर्गीकरण करून त्यांची योग्य विल्हेवाट लावावी. तसेच कार्यालयीन आवारातील कचरा, प्लास्टिक आणि टाकाऊ साहित्याची नियमितपणे विल्हेवाट लावण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. याशिवाय अभिलेख कक्ष, स्वच्छतागृहे, पेंट्री, वाहनतळ आणि कार्यालयाच्या दर्शनी भागाची स्वच्छता करण्यावरही भर देण्यात येणार आहे. स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यासाठी कार्यालयातील विविध शाखांमध्ये माहितीफलक आणि घोषवाक्ये लावण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# निवडणूक तयारीत सर्व यंत्रणांनी समन्वय ठेवावा : विभागीय आयुक्त जी. श्रीकांत

छत्रपती संभाजीनगर, दि.०८ :- ५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी सर्व मतदान केंद्रांवर आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे. मतपेट्या व पोलीस बंदोबस्ताच्या वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांना जीपीएस यंत्रणा बसवून मुख्य नियंत्रण कक्षातून त्यांचे निरीक्षण करावे. मतदानापूर्वी पोलीस प्रशासन व संबंधित समितीची बैठक घेऊन कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी योग्य




समन्वय ठेवून नियोजन करावे, अशा सूचना निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिल्या. विभागीय आयुक्त श्रीकांत यांच्या अध्यक्षतेखाली नोडल अधिकाऱ्यांची बैठक झाली. यावेळी निवडणूक प्रक्रियेतील विविध बाबींचा आढावाप्रसंगी त्यांनी या सूचना दिल्या. यावेळी सहआयुक्त प्रताप काळे, मंजुषा मिसकर, रित्रा मेत्रेवार, देविदास टेकाळे, खुशालसिंह परदेशी तसेच विविध कक्षांचे नोडल अधिकारी उपस्थित होते. तसेच आठही जिल्ह्यातील जिल्हाधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

जी.श्रीकांत म्हणाले, मतदान केंद्रांवरील मूलभूत सुविधांकडे विशेष लक्ष द्यावे. प्रत्येक केंद्रावर वीज, फर्निचर, पिण्याचे पाणी व उतारमार्ग यांसह (पान ३ वर)

# तालुका क्रीडा स्पर्धेत सीटीएमके गुजराती महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची चमकदार कामगिरी

## कोच सपकाळ व अलगटवार मॅडम यांच्या मार्गदर्शनाला यश; विविध क्रीडा प्रकारांत विद्यार्थ्यांनी मिळवली बक्षिसे

जालना : तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत जालना येथील सीटीएमके गुजराती महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा प्रकारांत उल्लेखनीय कामगिरी करत महाविद्यालयासह पालकांची मान उंचावली. शुक्रवार, दि. ९ ऑक्टोबर २०२६ रोजी खरपुडी येथील सैनिकी शाळेत आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपल्या क्रीडागुणांची चुणूक दाखवून दिली. विविध खेळांमध्ये विद्यार्थ्यांनी प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळवत यश संपादन केले.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे कोच सपकाळ सर आणि अलगटवार मॅडम यांचे मार्गदर्शन, सातत्यपूर्ण सराव व परिश्रम महत्त्वाचे ठरले. विद्यार्थ्यांमधील क्रीडाकौशल्य ओळखून त्यांना प्रोत्साहन देण्याचे काम प्रशिक्षकांनी केले. त्याचाच सकारात्मक परिणाम या स्पर्धेत पाहायला मिळाला.

खरपुडी येथील सैनिकी शाळेत शेख चांद सर यांच्या अध्यक्षतेखाली विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळपासून सुरू झालेल्या या स्पर्धा सायंकाळी चार ते पाच वाजेपर्यंत रंगल्या. धावण्याच्या स्पर्धांसह मैदानी व सांघिक खेळांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला.

या स्पर्धेत ६०० मीटर, ४०० मीटर आणि २०० मीटर धावणे, रिले यांसारख्या धावण्याच्या प्रकारांसह विविध मैदानी खेळांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच गोळाफेक व भालाफेक यांसारख्या क्रीडा प्रकारांतही विद्यार्थ्यांनी आपले कौशल्य सादर केले. प्रत्येक स्पर्धेत विजय मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर प्रतिस्पर्ध्यांना आव्हान दिले.

सीटीएमके गुजराती महाविद्यालयाच्या युवराज देशमुख, अक्षरा वाघमारे, ऋतुजा भुतेकर, शिवानी काळे यांच्यासह इतर विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला. विविध खेळांमध्ये विद्यार्थ्यांनी केलेली कामगिरी कौतुकास्पद ठरली. या स्पर्धांमधून विद्यार्थ्यांना आपल्या क्षमतांची जाणीव झाली असून, भविष्यात जिल्हा व राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये यश मिळविण्यासाठी नवी प्रेरणा मिळाली.

या क्रीडा स्पर्धेसाठी बदनापूर येथील



कोच सचिन मोहिते यांच्यासह मास्तर नांदेडकर, बाबुराव कावळे सर आणि हिवाळकर सर यांनीही उपस्थिती लावली. त्यांच्या उपस्थितीमुळे स्पर्धेतील उत्साह वाढला. विद्यार्थ्यांच्या क्रीडागुणांना वाव देणे, त्यांच्यात खिलाडूवृत्ती निर्माण करणे आणि भविष्यातील सक्षम खेळाडू घडविणे हा अशा स्पर्धांचा महत्त्वाचा उद्देश आहे.

विद्यार्थ्यांच्या यशाचे सर्वत्र कौतुक आजच्या स्पर्धेतील सहभाग आणि यश हे विद्यार्थ्यांच्या भविष्यातील क्रीडा वाटचालीसाठी महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. अभ्यासाबरोबरच क्रीडा क्षेत्रातही विद्यार्थ्यांनी आपली गुणवत्ता सिद्ध करावी, यासाठी शिक्षक व प्रशिक्षकांचे मार्गदर्शन मोलाचे ठरते. सीटीएमके गुजराती महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशामुळे महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील वाटचालीला प्रोत्साहन मिळाले आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयातील शिक्षक, प्रशिक्षक, पालक आणि क्रीडाप्रेमींनी आनंद व्यक्त केला. योग्य मार्गदर्शन, नियमित सराव आणि जिद्दीच्या जोरावर विद्यार्थी भविष्यातही क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

टीप : विद्यार्थ्यांनी कोणत्या खेळात नेमका प्रथम, द्वितीय किंवा तृतीय क्रमांक मिळवला, याची माहिती मिळाल्यास ती बातमीत समाविष्ट करून विजेत्यांची नावे आणि त्यांच्या यशाचा तपशील अधिक ठळकपणे देता येईल.